# परिपत्रक

**विषय :** वाहन नोंदणीकरिताच्या पत्त्याच्या पुराव्याबाबत.

वाहन नोंदणी करतेवेळी वाहन वितरकांद्वारे पत्त्याचा पुरावा सादर करतेवेळी भाडेकरुनची स्थानिक पोलीस स्टेशनकडे कळविलेल्या माहितीची प्रत मागणी केली जात असल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचेकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यक्षेत्रातील सर्व अधिकृत वाहन वितरकांना कळविण्यात येते की, वाहन नोंदणी करतेवेळी केंद्रिय मोटार वाहन नियम ४१ मध्ये नमुद पध्दतीने नोंदणीची प्रक्रीया पार पाडावी व नोंदणीसाठी नोंदणीकृत मालकाच्या पत्त्याचा अधिकृत पुरावा हा केंद्रिय मोटार वाहन नियम, ०४ प्रमाणे ग्राह्य धरण्यात यावा. त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे वाहन नोंदणीकरिता पत्त्याचा पुरावा ग्राह्य धरण्यात येऊ नये. वरील नमुद बाबींचे पालन न केल्यास आपणावर मोटार वाहन कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**पुणे.**

जा.क्र. १०२६४/नोंदणी/प्रापका/पुणे/२०२१
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
पुणे.
दिनांक : १३.१०.२०२१

**प्रति,**
**सर्व वाहन वितरक**
**पुणे.**

प्रत : संबंधीत सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.
प्रत : सर्व कार्यकारी अधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

# कार्यालयीन आदेश

**विषय :** वाहन नोंदणीकरिताच्या पत्त्याच्या पुराव्याबाबत.

वाहन नोंदणी करतेवेळी वाहन वितरकांद्वारे पत्त्याचा पुरावा सादर करतेवेळी भाडेकरुनची स्थानिक पोलीस स्टेशनकडे कळविलेल्या माहितीची प्रत मागणी केली जात असल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचेकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आदेशीत करण्यात येते की, वाहन नोंदणी करतेवेळी नोंदणीकृत मालकाच्या पत्त्याच्या पुराव्यासाठी केंद्रिय मोटार वाहन नियम ०४ नुसार पत्त्याचा पुरावा सादर केला आहे किंवा कसे याबाबत वाहन वितरकांकडे नोंदणी कागदपत्रांची नियमितपणे तपासणी करण्यात यावी व त्यामध्ये तफावत आढळल्यास त्या अनुषंगाने निम्नस्वाक्षरीतांकडे अहवाल सादर करावा.

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**पुणे.**

जा.क्र. १०२६४/नोंदणी/प्रापका/पुणे/२०२१
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
पुणे.
दिनांक : १३.१०.२०२१

**प्रति,**
**सर्व संबंधीत मोटार वाहन निरिक्षक**
**नविन वाहन नोंदणी विभाग**

प्रत : संबंधीत सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.
प्रत : सर्व कार्यकारी अधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

माहितीचा
अधिकार

जा.क्र.२७८/ननोंवि/माअ/पुणे/२०२२
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे
३९, डॉ. आंबेडकररोड, संगम
पुलाजवळ,पुणे-४११००१.
ई-मेल:rto.12-mh@gov.in
दिनांक:-०४.०१.२०२२

**प्रति,**

मगरध्वज काशीद (मंगेश पाटील)
ॲडव्होकेट शिवरकर असो,
शॉप नं के १०६ मेगा सेंटर ,
पुणे सोलापूर रोड हडपसर
पुणे-४११०१३.

**विषय- केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत मागविलेली माहिती**
**संदर्भ- आपला अर्ज आ.क्र. ११४०३ दिनांक-१६.१२.२०२१**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अंतर्गत आपण अपेक्षीलेली माहिती खालीलप्रमाणे मुद्देनिहाय पुरविण्यात येत आहे.

१) पहा जोडपत्र १. परिपत्रक

२) पहा जोडपत्र २. कार्यालयीन आदेश

(पवन नव्हाडे)
**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**पुणे.**

उपरोक्त माहितीबाबत आपण असमाधानी असल्यास ही माहिती प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण विहीत नमुन्यात अपील अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी , पुणे यांचेकडे दाखल करु शकता.

अपिलीय प्राधिका-यांचे नाव व पत्ता-
श्री संजीव भोर ,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रादेशिक परिवहन कार्यालय,पुणे
संगम पुलाजवळ, डॉ. आंबेडकर रोड, पुणे४११००१.